वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि.१ जानेवारी २०२६ पाने ४ किंमत ३

# बीडमधील इज्तेमासाठी हजारो मुस्लिम बांधवांची गर्दी




बीड, (दिव्य न्युज):- बीड्सह वडवणी, शिरूर कासार या तीन तालुक्यांच्या इज्तेमाला बीड शहरातील मोमीनपुरा बायपास रोडवरील इज्तेमागाह येथे काल सायंकाळी सुरूवात झाली आहे. आज सकाळपासून दुपारी ३ पर्यंत तीन प्रमुख धर्मगुरुंनी मार्गदर्शन केले असून आज रात्री ८ वाजता (मगरीबच्या नमाजनंतर) सामुहिक दुवाने समारोप होणार आहे. पुणे येथील धर्मगुरु मौलाना जावेद साहब हे मार्गदर्शनानंतर दुवा करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान तीन तालुक्यांसाठी होत असलेल्या या इज्तेमामध्ये मुस्लिम बांधव हजारोंच्या संख्येने दाखल झालेले आहेत. त्यांच्या सेवेसाठी शेकडो स्वयंसेवक कार्यरत असून प्रत्येकाला वेगवेगळी जबाबदारी देण्यात आलेली आहे. दुपारी उशिरापर्यंत मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने इज्तेमागाहस्थळी दाखल होत होते.

# खरचं याला म्हणतात काम, अजितदादांनी बीडच्या सभेत ८ कोटींची ऑर्डर दाखवली

## विकासासाठी एक रूपयाही कमी पडू देणार नाही-अजितदादा

### नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी नाट्यगृहासाठी ८ कोटींपेक्षा अधिक निधीस मान्यता

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com





बीड,(दिव्य न्युज):- जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चांगलं काम सुरू आहे. त्याबद्दल मुख्यकार्यकारी अधिकारी आणि पुर्ण टीमचे कौतूक करत शहरासह ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन कटीबध्द असल्याचा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केला. बीड शहराच्या विकासासाठी १ रूपयाचाही निधी कमी पडू देणार नाही, आजच यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी ८ कोटी रूपयांपेक्षा अधिकच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे सांगून दादांनी जाहीर सभेत आजच्या तारखेतील सोबत आणलेली ऑर्डर दाखवली आणि याला म्हणतात काम असे म्हणत दादांनी टप्पा-टप्प्यात बीड शहराचा विकास करणार असल्याचे सांगितले. दरम्यान कामासाठी गुत्तेदार चांगला द्या, कामं न करता जर कोणी गडबड करण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अजिब्बात सोडणार नाही, त्याला नक्कीच चक्की पिसायला लावील असा इशारा देत जनतेचा पैसा आहे तो जनतेला दिसलाच पाहिजे असेही स्पष्ट केले.

बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर आयोजीत जिल्हा परिषदेच्या १ हजार विकास कामांचे भुमिपुजन व इतर कार्यक्रम प्रसंगी ना.अजितदादा बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खा.बजरंग सोनवणे, आ.प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस,आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी ▶▶ पान २ वर

# अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी शासनाने केला निधी मंजूर-वसीम बुऱ्हाण

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मोठे ऐतिहासिक यश! या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्यांक मंत्री मा. श्री अजितदादा पवार साहेब यांचे विशेष व मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. दिनांक ३१/१२/२०२५ महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: अविवि- २०२५ /प्र. क्र.५६/का- ६ अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी शासनाकडून १९.२० कोटींचा निधी वितरित करण्यास मान्यता!महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे राज्यसदस्य वसीम बुऱ्हाण यांच्या ▶▶ पान २ वर








## बीडमध्ये भाजपला सत्तेत नो एन्ट्री!

# क्षीरसागर बंधू एकत्र येण्याची हालचाल दिसताच विजयसिंह पंडितांनी डाव साधला

बीड, (दिव्य न्युज):- नगर पालिकेची निवडणुक अटीतटीची झाली. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व राष्ट्रवादी अशा तिरंगी सामन्यात राष्ट्रवादी काँग्रेसने बाजी मारली. आता उपनगराध्यक्षपदासह विषय समित्यांच्या निवडीसाठी नेत्यांचे राजकीय डावपेच सुरु असून त्यांचे समर्थक आडाखे बांधत आहेत. आता यात बाजी कोण मारणार? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.
▶▶ पान २ वर



## चुकांबद्दल माफी मागते, सर्व अर्ज मागं घेतले

# वाघीण जखमी झाल्यावर ती अजून जोरात काम करते, पूजा जाधव यांना रडू कोसळलं






पुणे, (दिव्य न्युज):- पूजा जाधव हिनं पुणे महानगरपालिका वॉर्ड क्रमांक २ मधून माघार घेतली आहे. भाजपकडून प्रभाग क्रमांक २ मधून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियावरुन जोरदार टीका करण्यात आली होती. त्यामुळं पूजा जाधव हिनं अर्ज मागं घेतला. त्यानंतर पुण्यात पत्रकार परिषद घेत तिनं भूमिका स्पष्ट केली. विरोधकांनी षडयंत्र केलं, त्याची ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये स्वस्त धान्य गोदामकीपरचा काळा बाजाराचा धंदा?

## होलसेल व्यापारी झाल्याची चर्चा

## बीडमध्ये स्वस्त धान्य घोटाळा भोकळला!, नेकनूर, चौसाळा, बीड शहर आणि ग्रामीण या गोदामांची सखोल चौकशी करण्याची मागणी




### बीड तालुक्यात तीन वर्षांपासून चिटकलेला गोदामकीपर? नायब तहसीलदारांचा पाठबळाचा आरोप

बीड तालुका पुरवठा विभागात तीन वर्षांपासून ठोकून कोशिरा चिटकून बसलेल्या गोदामकीपर विनोद दोडके यांच्यावर कारवाई का होत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. यात तालुका पुरवठा विभागातील तहसीलदार प्रशांत सुपेकर यांचा सरळ पाठबळ असल्याचे समोर येत आहे. मात्र, जिल्हाधिकारी या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.कारवाईबाबत शांतता का?स्थानिक नागरिक आणि स्वस्त धान्य दुकानदारांच्या माहितीनुसार, दोडके यांचा कारभार काळा बाजार आणि भ्रष्टाचाराने भरलेला आहे. तरीही तीन वर्षांपासून कोणतीही कारवाई झालेली नाही. तहसीलदार सुपेकर यांचे थेट समर्थन मिळाल्याने हा प्रकार सुरू असल्याचे सांगितले जाते. यापूर्वी नेकनूर, चौसाळा, बीड शहर आणि ग्रामीण गोदामांमधील घोटाळ्याच्या आरोपांनंतरही कोणतीही हालचाल झालेली नाही.

### गोदामकीपर दोडके 'होलसेल' व्यापारी, १००० ला खरेदी–२४०० ला विक्री! गोदामात लुट धान्य! बीड दोडके भुकेल्या व्यापारी! कमिशन डबल गेम सुरू!

बीड: जिल्ह्यात स्वस्त धान्य योजनेचा सर्वात मोठा घोटाळा उघड होण्याच्या उंबरठ्यावर! यात माजी गोदामकीपर विनोद दोडके यांची मध्यवर्ती भूमिका, असा गंभीर आरोप.दोडके हे आता सरकारी गोदामकीपर नसून खऱ्या अर्थाने होलसेल व्यापारी झाले आहेत. स्वस्त धान्य दुकानदारांकडून फक्त १००० रुपयांना धान्य खरेदी करून ते काळ्या बाजारात २४०० रुपयांना विक्री करत असल्याची धक्कादायक बाब समोर आली. हा सर्व धंदा राजेरोसपणे चालू असून, बीड शहरात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे.गोदामात लुट धान्याची लूट! गरीबांची उपासमार वाढतेय, प्रशासन मात्र डोळे झाकून बसलंय. पुरवठा विभागाने तातडीने चौकशी करून दोडकेंवर कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा भडका उडेल!

### कारवाईबाबत शांतता का?

स्थानिक नागरिक आणि स्वस्त धान्य दुकानदारांच्या माहितीनुसार, दोडके यांचा कारभार काळा बाजार आणि भ्रष्टाचाराने भरलेला आहे. तरीही वर्षांपासून कोणतीही कारवाई झालेली नाही. तहसीलदार सुपेकर यांचे थेट समर्थन मिळाल्याने हा प्रकार सुरू असल्याचे सांगितले जाते. यापूर्वी नेकनूर, चौसाळा, बीड शहर आणि ग्रामीण गोदामांमधील घोटाळ्याच्या आरोपांनंतरही कोणतीही हालचाल झालेली नाही.

### धान्य घोटाळ्यासाठी दोड(के) बोकडा सारख बोकरत बो,,बडे होण्यासाठी फुफाट्याची ज्वारी गरिबांच्या ताटात

धान्य घोटाळ्याने उडालेल्या धुरातून फसवणूक करणारे नेते दोड(के)करून बोकडा सारखे बोबडे करत बडे होण्याचा प्रयत्न करत आहेत. गरिबांच्या ताटातूनच फुफाट्याची ज्वारी चोरून खिशात टाकण्याचा हा ड्रामा!अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, सरकारी धान्य साठ्यावरून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा उधळला गेला. नेत्यांनी मात्र बोकण्यातच वेळ काढला – आम्ही निर्दोष! असा खोटा रडगा घातला. फुफाट्याची ज्वारी, जी गरीबांसाठी राखीव होती, तीच राजकीय नेत्यांच्या बडेपणासाठी वापरली गेली.

बीड (दिव्य न्युज):– बीड शहरातील स्वस्त धान्य गोदामकीपर विनोद दोडके यांच्यावर मनमानी कारभार आणि काळा बाजाराचा धंदा चालवल्याचा गंभीर आरोप होत आहेत. स्वस्त धान्य दुकानदारांकडून कमी किमतीत धान्य खरेदी करून बाजारात चव्हाट्याच्या भावात विक्री करत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नेकनूर, चौसाळा, बीड शहर आणि ग्रामीण अशा चार गोदामांवर पूर्वी कारभार चालत होता, मात्र आता फक्त दोन गोदामांवर मर्यादित राहिल्याने संशय वाढला आहे.ग्रामीण गोदामात धान्य गायब?ग्रामीण गोदामात स्वस्त धान्य दुकानदारांना एक प्रकारचे धान्य दिले जाते, तर दुसऱ्या प्रकारचे धान्य गायब होत असल्याचे सांगितले जाते. हे धान्य थेट काळ्या बाजारात विकले जात असल्याचा आरोप आहे. चौसाळा आणि नेकनूर गोदामांमध्येही मोठा घोटाळा झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. दुकानदारांना दमदाटी करून हजार रुपयांत धान्य खरेदी करून बाजारात २४०० रुपयांना विक्रीचा हा धंदा रोज चालू असल्याची माहिती मिळाली.जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशीची मागणी या प्रकरणात अधिकाऱ्यांच्या पाठबळामुळे हा कारभार सुरू असल्याची चर्चा बीड जिल्ह्यात जोरदार रंगत आहे. नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून



नेकनूर, चौसाळा, ग्रामीण आणि बीड शहर या चारही गोदामांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. धान्य किती आले, किती शिल्लक आहे याची पूर्ण पडताळणी झाल्यास मोठा भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून

## खरचं याला म्हणतात

अधिकारी जितीन रहेमान, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, माजी आ.संजय दौंड, शेख निजाम, शेख मुजीब आदि मान्यवर उपस्थित होते.

नववर्षाच्या प्रथम शुभदिनी बीड जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ऐतिहासिक सोहळा छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे संपन्न झाला. जिल्हा परिषद बीड अंतर्गत १३६३ विकास कामांचं भूमिपूजन व आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहून जनतेशी संवाद साधला.

बीड जिल्ह्याच्या निर्मितीनंतर प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर विकास कामांचा शुभारंभ होत असून, ग्रामीण भागापर्यंत मूलभूत सुविधा पोहोचवण्याचा आमचा ठाम संकल्प आहे. पाणीपुरवठा, रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्य, शाळांचं सुसज्जीकरण, समाजोपयोगी लघु विकासकामं यांवर विशेष भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील १२०० हून अधिक शाळांची कामं सुरूअसून शिक्षण आणि समाज यांच्यातील नातं अधिक घट्ट झालं आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून सातत्यानं मदत दिली जात आहे.

बीडमध्ये इलेक्ट्रिक रेल्वे, विमानतळ प्रकल्प तसंच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी शासन प्रयत्नशील आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी तातडीनं उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

विकास कामांचा दर्जा राखला गेला पाहिजे, याबाबत अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, हीच आमची भूमिका आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या दूरदृष्टीनं स्वराज्य उभारलं, त्याच प्रेरणेतून बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

## अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या

पाठपुरावाला मोठा यश...!अल्पसंख्यांक आयोगाचे राज्यसदस्य वसीम खाजाभाई बुऱ्हाण यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे व संघर्षामुळे राज्यात सन २०१९ ते २०२६ या कालावधीतील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची मेडिकल, तंत्रज्ञान तसेच कृषी शिक्षणाची बंद असलेली शिष्यवृत्ती पुन्हा मंजूर करण्यात आली आहे. या अनुषंगाने शासनाने एकूण १९ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करून शासन निर्णय जारी केला आहे.ही मागणी विविध संघटनांनी सातत्याने लावून धरली होती, त्यास आज यश मिळाले आहे.

## क्षीरसागर बंधू एकत्र

त्रिशंकु संख्याबळ असल्याने क्षीरसागर बंधू एकत्र येणार की पंडित बाजी मारणार? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

नगरपालिका निवडणुकीने बीड शहराच्या आणि विधानसभा मतदारसंघाच्या राजकारणाची गणिते कमालीची बदलली आहेत. मागच्यावेळीही तिरंगी लढतीमध्ये दोन क्षीरसागर आमने – सामने होते. परंतु, निकालानंतर नगराध्यक्षपद एकाकडे आणि उपनगराध्यक्ष एकाकडे अशी सत्तेची विभागणी झाली. या निवडणुकीत डॉ. योगेश क्षीरसागर यांनी भाजपात प्रवेश केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसची धुरा ऐनवेळी आमदार विजयसिंह पंडित (तळक्षरूडळपहर झरपवळीं) यांच्यावर आली.निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार असा अटीतटीचा तिरंगी सामना झाला. त्यात नगराध्यक्ष आणि १९ नगरसेवकांसह बाजी मारली. नगरसेवकांच्या संख्येत राष्ट्रवादीच्या खालोखाल भाजपचेही १५ नगरसेवक विजयी झाले. तर, आमदार संदीप क्षीरसागर (डरपवशशघिीहळीीरसरी) यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचेही १२ सदस्य विजयी झाले.

आता निवडणुकीपूर्वी 'गेवराईचे पार्सल', 'तुमच्या काकाचा पक्ष' या डॉ. योगेश क्षीरसागरांच्या टोलेबाजीला उत्तर देण्यासाठी विजयसिंह पंडित यांनी कंबर कसली आहे. शिवसेनेचे अनिल जगताप, राजेश्वर चव्हाण, संजय दौंड, बळीराम गवते या साथीदारांसोबत प्रयत्न सुरु केले आहेत. पक्षाच्या १९ सदस्यांसोबत शिवसेना, काँग्रेस व एमआयएमलाही गळाला लावत त्यांनी शिव-शाहू-फुले-आंबेडकर बीड शहर विकास आघाडीची स्थापना केली आहे.या आघाडीचा उपनगराध्यक्ष आणि विषय समित्यांचे अंकणित जुळल्याचा दावाही या पक्षाच्या नेत्यांकडून केला जात आहे. या निवडणुकीत शिवसेनेचे ३, काँग्रेस आणि एमआयएमचे प्रत्येकी १असे नगरसेवक विजयी झाले आहेत. त्यामुळे ऐनवेळी वरिष्ठांकडून भाजपसोबत युतीचा निरोप आला किंवा दोन्ही क्षीरसागर बंधू एकत्र आले तरी आधीच समीकरण जुळवून ठेवत पंडीत यांनी भाजपची सत्तेतील एन्ट्रीची शक्यता धूसर केली आहे.

क्षीरसागरांबाबत ३ शक्यता

एका बाजूला राष्ट्रवादी काँग्रेसने कॉन्फिडन्स दाखवला असला तरी दुसरीकडे संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेवकांची बीड शहर विकास आघाडी स्थापन झाली आहे. यामध्ये १३ सदस्यांचा समावेश आहे. तर, डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे १५ नगरसेवक आहेत. या दोघांचा एकत्रित आकडा उपनगराध्यक्षपद व विषय समित्यांमध्ये विजयाचे गणित जुळविणारा आहे.

दरम्यान, निकालाच्या दिवशीच भाजपच्या गटनेत्या डॉ. सारिका क्षीरसागर यांनी 'कोण म्हणतय क्षीरसागरमुक्त', संदीप क्षीरसागर आपले 'दीर'अशी प्रतिक्रिया दिली होती. याचा आधार घेत दोन्ही क्षीरसागरांनी एकत्र येतील व डॉ. सारिका क्षीरसागर उपनगराध्यक्ष होतील, अशी एक अटकळ बांधली जात आहे.तर, राज्याच्या युतीच्या फॉर्म्युल्यानुसार भाजपला सत्तेत सोबत घ्यावे, यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून थेट अजित पवारांपर्यंतही प्रयत्न सुरु आहेत. तिसरी सर्वात मोठी शक्यता म्हणजे, संदीप क्षीरसागर यांच्या आघाडीला भाजपने बाहेरुन पाठींबा द्यायचा आणि पंडितांचा डाव उधळायचा प्रयोग देखील होऊ शकतो, अशीही चर्चा आहे. नेमके घडते काय? हे लवकरच कळणार आहे

## वाघीण जखमी झाल्यावर

बळी ठरले, असंही पूजा जाधवनं म्हटलं. मी स्वतः हिंदू आहे, हिंदुत्वासाठी काम करेल. आतापर्यंत झालेल्या चुकांबद्दल माफी मागते, जिथे भाजपला गरज आहे तिथं काम करणार आहे. वाघीण जखमी झाल्यावर ती अजून जोरात काम करते, असं पूजा जाधव हिने म्हटलं.

आजचा हा दिवस माझ्यासाठी खूप अवघड दिवस आहे. मला गेल्या दहा ते बारा वर्षाचा संघर्ष आठवतो. बीडच्या गेवराई तालुक्यातील गावात जन्म झाला. माझे वडील ग्रामपंचायतीचे सरपंच देखील नाहीत. शेतकऱ्यांसाठी काम केल्यानं वयाच्या २१ व्या वर्षी पंचायत समिती म्हणून काम केलं.

शेतकऱ्यांसाठी आयुष्य झोकून दिले, माझ्यावर पाच गुन्हे दाखल झाले. प्रत्येक कार्यकर्त्याच्या आयुष्यात हे होत नाही. महिलांचा, शेतकऱ्यांचा, शेतकऱ्यांच्या लाठ्या काठ्या खाल्ल्या. गुन्हे दाखल व्हायचे तेव्हा पोलीस स्टेशनला पाच सहा तास, दोन दोन दिवस झोपलेले. वकिलांचे फी भरण्यासाठी पैसे नसायचे. संघर्ष करत राहिले, असं म्हणत पूजा जाधव पत्रकार परिषदेत रडू लागल्या.

छत्रपती संभाजीराजे यांच्या मराठा क्रांती मोर्चामध्ये काम करत असताना त्यांनी एकत्र आणलं आणि लग्न झालं. लग्नानंतर दुसऱ्या दिवशी बाहेर पडले आणि प्रभागासाठी काम करायला लागले. शेतकरी विरुद्ध कारखानदार असा संघर्ष केला.

लग्नानंतर २० ते २३ दिवसानंतर काश्मीर गेलेलो होते, तिथं हल्ला झालेला होता.रक्तात चळवळ होती, संघर्ष होता आम्ही घरातून बाहेर पडलो, महाराष्ट्रातील लोकांना बाहेर काढलं,देवेंद्र फडणवीस यांना व्हिडिओ कॉल केलेला. व्हायरल झालेला व्हिडिओ ती एका तासात दिलेली प्रतिक्रिया होती.

दहशतवाद्यांना आपल्या देशात हिंदू-मुस्लीम करायचं होतं. तीन तासानंतर वातावरण बदललं होतं, त्यानंतर प्रतिक्रिया आल्या खरंच त्यांना धर्म विचारुन मारल्याचं समोर आलं, हे देखील सांगितलं होतं, पण ते लोकांपर्यंत गेलं नाही. पक्षाच्या वरच्या लेव्हलला मोठ्या मोठ्या घडामोडी घडत असतात त्याचं विक्टीम झाले. पहलगाम आणि काश्मीरचा हल्ला धर्म विचारुन झालेला आहे हे सांगितलं होतं. मात्र, ते खालीपर्यंत पोहोचू शकले नाही, असं पूजा जाधव हिनं म्हटलं.

प्रभाग क्रमांक १ आणि २ ची तयारी करत असताना सामान्य घरची मुलं उमेदवारी आणतात हे अनेकांना सहन होत नाही.विरोधकांची प्रभागाची टीम आहे. त्याची विक्टिम मी बनत आहे. राहुल गांधीचा वीडियो व्हायरल होतोय. तेव्हा शेतकऱ्यांचा प्रश्न घेऊन मी राहुल गांधीकडे घेऊन गेले होते, असंही पूजा जाधव म्हणाली.विरोधकांनी हे षडयंत्र केल आहे.माझ्या पतीला देव मानून आणि सगळं ऐकून त्यांचे आभार मानते, भाजपचे आभार मानते. ८/१० च्या खोलीत धनंजय जाधव मोठे झाले आहेत. सामान्य माणसाचा बळी घेतला जातो. पोस्ट टाकून मुलीचं आयुष्य वाया घालवलं जातं. मी भाजपमध्ये काम केलं संघ परिवाराने मला समजू घेतले. मी स्वतः हिंदू आहे. हिदुत्वासाठी काम करेल, झालेल्या चुकांबद्दल माफी मागते, असं पूजा जाधव हिनं म्हटलं. जिथे भाजपला गरज आहे तिथं काम करते. वाघीण जखमी झाल्यावर ती अजून जोरात काम करते, असं पूजा जाधव हिनं म्हटलं. राजकीय आयुष्य आपल्या दोघांच आहे. माझ्यामुळे तुमच्या राजकीय जीवन मागे गेलं असेल तर मला माफ करा, असं म्हणज पूजा जाधव हिनं धनंजय जाधव हिची माफी मागितली. निवडणुकीतून सर्व अर्ज मागं घेतल्याचं देखील पूजा जाधव हिनं सांगितलं.

आमच्या दोघांचा विवाह झाला, आमच्या दोघांची पक्षीय भूमिका तुम्ही सर्वांनी पाहिली. माझा संघर्ष टू व्हीलरपासून इथंपर्यंत आहे. आम्ही प्रत्येक भूमिकेशी प्रामाणिक राहिलो आहे. सोशल मीडियाचा बळी माझी पत्नी ठरली आहे. माझ्या पत्नीचे शब्द नव्हते, ते तिच्या तोंडात घातले गेले. आदरणीय देवेंद्र फडणवीस यांच्या आरक्षण मागतोय, तुमची बायको नाही हे स्टेटमेंट पूजा जाधव हिचं नव्हतं, असं धनंजय जाधव म्हणाले.पहलगामच्या प्रकरणात तिनं चुकीचं केलं नाही हे ती सांगेल. कार्यकर्त्यानं ठरवलं तर काय करू शकतो हे २०२६ च्या निवडणुकीतून पुणे शहरातून दाखवून दिलं आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये तयारी केली, तिथल्या माता भगिनी, भाऊ आलेले आहेत. कोणत्याही पक्षाच्या सर्व्हेत आम्ही प्लस होतो. तिथं काय समीकरणं झाली, निष्ठावताला संधी दिली, त्याचा आम्ही स्वीकार केला. प्रभाग क्रमांक १ च्या नागरिकांची माफी मागतो. सुहास चव्हाण, आदिती बाबर यांची माफी मागतो, असं धनंजय जाधव यांनी म्हटलं.

# सिग्नल यंत्रणा धुळखात, वाहतुकीला शिस्त लागणार तरी कशी?

## २ कोटी ४४ लाखांचा दंड वसूल, वाहतूक शाखेकडून वर्षभरात ६१ हजार कारवाया

बीड, (दिव्य न्युज):- जिल्हाचे मुख्य शहर असलेल्या बीड शहरात ठिकठिकाणी बसविलेले सिग्नल सध्या केवळ शोभेपुरते परंतु धूळखात पडून आहेत.मागील अनेक वर्षापासून हे सिग्नल बंद असून काही ठिकाणी त्याचे खांबही वाकडे झाले आहेत. आता नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने पुढाकार घेतला तर हे सिखल सुरु होवू शकतात. त्यामुळे दैनंदिन वाहतुकीला शिस्त येवू शकते. दरम्यान सन २014 च्या तुलनेत सन २०२५ मध्ये पोलिसांकडून वाहतूक नियमांची अंमलबजावणी अधिक कठोरतेने केली. विशेष नाकाबंदी व मोहिमांच्या माध्यमातून नियमभंग करणाऱ्यांविरोधात कारवाया झाल्या. सन २०२५ मध्ये जिल्हाभरात एकूण ६0 हजार ९८६ कारवाया करत २ कोटी ४४ लाख २१ हजार २00 रुपयांचा दंड आकारला. यापैकी १ कोटी १0 लाख ७३ हजार ६५0 रुपयांची वसुलीझाली आहे.



वाहतूक जनजागृतीसाठी जिल्ह्यातील १९ शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यक्रम राबवण्यात आले असून हेल्मेट, सीट बेल्ट वापर, ओव्हरस्पीडिंग व अवैध सायलेंसरच्या धोक्यांबाबत नागरिकांना जागरूक करण्यात आल्याचे वाहतूक पोलीस सांगतात. दुसरीकडेअनेकदा चालन कारवायावरुन नागरिक आणि पोलिसांतील संघर्षही दिसून येतो. त्यामुळे पोलिसांनाही नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. असे असले तरी वाहतूक पोलिसांकडून होणाऱ्या वाहन तपासणीदरम्यान नागरिकांना त्यांच्या चोरी झालेल्या दुचाकीही परत मिळतात. वर्षभरात वाहन तपासणीत हस्तगत झालेल्या चोरीच्या ९ दुचाकी मूळ मालकांना परत देण्यात आल्या. लोकअदालतीतून सन २०२५ मध्ये ४,१२५ वाहनचालकांकडून २६ लाख ८९ हजार ५५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या ३२४ जणाविरुद्ध कारवाई करण्यात आली असून ही संख्या सन २०२४ पेक्षा १८८ ने अधिक आहे. सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्धही वाढीव कारवाया करण्यात आल्या आहेत.

### ३५० बुलेटचे सायलेंसर हटविले!

विशेष मोहिमाअंतर्गत कर्णकर्कश आवाज करणाऱ्या सायलेंसरप्रकरणी ३५० बुलेट वाहनांवर वाहतूक शाखेकडून वर्षभरात कारवाई करण्यात आली, तर २,१३० वाहनांवरील फॅन्सी नंबर प्लेटविरोधात दंडात्मक कारवाई करून ४५० नंबर प्लेट जप्त करण्यात आल्या. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरसह इतर वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यासाठी जनजागृती मोहिमा राबवण्यात आल्या.

### हिट अँड रन योजनेअंतर्गत ४८ लाखांची मदत

अज्ञात वाहनांच्या धडकेत मृत्युमुखी पडलेल्या २४ जणांच्या वारसाना प्रत्येकी २ लाख रुपये प्रमाणे एकूण ४८ लाख रुपये, तसेच ८ गंभीर जखमीना प्रत्येकी ५० हजार रुपये प्रमाणे ४ लाख रुपये, असे एकूण ५२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मिळवून देण्यात आले आहे. या बाबतीत राज्यात बीड पोलीस आघाडीवर आहेत.

### १९० क्रिटिकल स्पॉटचे सर्वेक्षण

प्राणांतिक अपघात रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेने इतर विभागांच्या मदतीने जिल्ह्यातील ब्लॅक स्पॉट्सचे सर्वेक्षण केले, त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला आवश्यक उपाययोजनांबाबत लेखी सूचना दिल्या, याचा चांगला परिणाम म्हणजे 'सेव्ह लाईफ फाऊंडेशन 'व्या सहकार्याने १९0 क्रिटिकल पॉईंट्सवर प्रत्यक्ष पाहणी करून सुधारणा सुचविण्यात आल्या, ज्यामुळे अनेक ठिकाणी अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे.

# शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली नाही तर रेल्वे धावू देणार नाही-बच्चू कडू

## जिंतूरमधील भव्य शेतकरी परिषदेत सरकारवर कडाडून टीका; १ जुलैचा इशारा

जिंतूर,(दिव्य न्युज):- जिंतूरमधील भव्य शेतकरी परिषदेत सरकारवर कडाडून टीका; १ जुलैचा इशारा शेतकऱ्यांची तात्काळ कर्जमुक्ती केली नाही तर १ जुलैपासून रेल्वे धावू देणार नाही, असा थेट इशारा प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी जिंतूर शहरातील दादा शरीफ चौक येथे आयोजित भव्य शेतकरी, शेतमजूर व दिव्यांग परिषदेत दिला. या परिषदेतून त्यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार शब्दांत टीका केली.

बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरलो आहोत. मात्र या लढ्यात शेतकऱ्यांनी एकजुटीने आमच्यासोबत उभे राहिले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये उसाला वेगवेगळा दर मिळतो, गुजरातमध्ये उसाला ४७०० रुपये दर मिळतो, तर महाराष्ट्रात उसाला कमी दर मिळतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले. गुजरातचा ऊस साखर देतो आणि महाराष्ट्राचा ऊस मीठ देतो का? असा सवाल उपस्थित करत माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या साखर कारखान्यात उसाला २४०० रुपये दर दिला जात असतानाही शेतकरी त्यांनाच निवडून देतात, अशी टीका त्यांनी केली.भाजप सरकारने कापूस, सोयाबीन, तूर, केळी यासह कोणत्याही शेतीमालाला योग्य भाव दिला नाही, असा आरोप करत बच्चू कडू म्हणाले की, भाजप सरकारने शेतकऱ्यांचे आंदोलन वर आले नाही पाहिजे यासाठी आंदोलनावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याचे ठरवले आहे. भाजप हिंदूंना, काँग्रेस मुस्लिम व दलितांना हाताशी धरते, या राजकीय लढाईतून शेतकऱ्यांना बाहेर काढणे कठीण झाले आहे, असे म्हणत त्यांनी सरकारवर कडाडून टीका केली.

या परिषदेत ऑल इंडिया पँथर सेनेचे दीपकभाई केदार यांनीही सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. ३१ जूनपर्यंत कर्जमुक्ती झाली नाही तर नागपूरचे आंदोलन ही फक्त झाकी असून पुढचे आंदोलन अधिक तीव्र असेल, असा इशारा त्यांनी दिला. चंद्रपूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने एक लाख रुपये कर्ज घेतले असता त्यावर तब्बल ७४ लाख रुपयांचे व्याज लावण्यात आले, त्यामुळे त्या शेतकऱ्याला मूत्रपिंड विकावे लागले, तरीही राज्याचे मुख्यमंत्री साधा ट्विट करत नाहीत, अशी संतप्त टीका त्यांनी केली.राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनीही सरकारच्या धोरणांवर टीका करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला.ही परिषद शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व दिव्यांग यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. या परिषदेतून येलदरी धरणातून जिंतूर तालुक्यासाठी स्वतंत्र कालवा काढण्यात यावा, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करून सातबारा कोरा करावा, करपरा-दुधना नदी तसेच तालुक्यातील ओढे-नाल्यांचे सरळीकरण, रुंदीकरण व खोलीकरण करावे, २०२० पासून रखडलेला पीक विमा तात्काळ द्यावा, रानटी प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीवर तातडीची उपाययोजना करावी, तसेच पाटबंधारे विभागाने



कालवे व चाऱ्यांची दुरुस्ती करावी, अशा अनेक मागण्या मांडण्यात आल्या.

या कार्यक्रमाला प्रशांत डिक्कर, रविंद्र इंगळे, माधुरी क्षीरसागर, प्रा. प्रफुल्ल भोजने, अमृतदादा शिंदे, माणिक कदम, अच्युत रसाळ, शिवलिंग बोंधने, अशोक हाके, विनोद भोळे, विश्वंभर गोरवे, बाळासाहेब आळणे, पांडुरंग लांडगे, लिंबाजी कचरे, हनुमान आमले, हेमचंद्र शिंदे, शरद चव्हाण, भागीरथ मिरासे, माधव दाभाडे, माधव खरात, सचिन राठोड, प्रसाद गोरे, ओंकार पवार, रामप्रसाद माघाडे, माऊली निरवळ, रामकिसन घाटोळ, सोपान मोरे, रमाकांत गोरे, कृष्णा राऊत, दगडूबा वजीर, दीपक कास्टे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणिक कदम यांनी केले. प्रास्ताविक इरशाद पाशा चांद पाशा पिंपरीकर यांनी मांडले, तर आभार सचिन राठोड यांनी मानले. दुधगाव महसूल मंडळासह जिंतूर तालुक्यातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेचे आयोजन दुधगाव महसूल मंडळ, जिंतूर तालुका शेतकरी संघर्ष समिती यांच्या वतीने करण्यात आले होते.

# अण्णासाहेब पाटील महामंडळ जाचक अटी टाकून मराठा उद्योजकांची अडवणूक

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे; जाणीवपूर्वक टार्गेट केलं जातंय-शिंदे



बीड, (दिव्य न्युज):- अण्णासाहेब पाटील महामंडळांतर्गत जाचक अटी टाकून मराठा उद्योजकांची अडवणूक केला जात असल्याचा आरोप रवि शिंदे व इतर तरूणांनी केला आहे. महामंडळ जाणीवपूर्वक टार्गेट करत सल्याचेही शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ बचाव अशी मागणी करत शिंदे व त्यांच्या सहकार्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज धरणे आंदोलन सुरू केले आहे.निवेदनात म्हटले आहे की,मराठा समाजात शेतकरी प्रवर्ग खूप मोठ्या प्रमाणात असल्याने अर्ज करेल त्याला ट्रॅक्टर देण्यात यावे,७/१२ आणि ८ अ ची अट कमी करावी कारण मराठा समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे ७/१२ असेल असे कसे शक्य आहे,२०१८ ते २०२४ चे अर्ज महामंडळाच्या लाभार्त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या प्रोफाईलमध्ये अझझड्ध ऋज्ञठ छएथ डजख असे दाखवत आहे त्यामुळे त्या सर्व लाभार्थ्यांनाना त्यांचे बँकेचे मंजुरीपत्र महामंडळास अपलोड करता येत नाहीये त्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास अडचण येत आहे ते सर्व अर्ज पूर्ववत करावेत, महामंडळाचा नवीन अर्ज भरतांना उत्पन्न प्रमाणपत्राची मर्यादा किती आहे ते महामंडळाच्या पोर्टलवर टाकणे आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ जर फक्त आम्ही बँकेकडून काढलेल्या व्यावसायिक कर्जावरचे व्याज परतावा करणार असेल तर उत्पन्न प्रमाणपत्राची मर्यादा कंपल्सरी कशासाठी, बँक तर कर्ज घेतांना लाभार्थ्याचे तहसीलचे उत्पन्न प्रमाणपत्र विचारात न घेता त्याच्या व्यावसायिक इन्कमटॅक्सवरच कर्ज प्रक्रिया करते. बँकेत कर्ज देतांना जे तहसीलचे उत्पन्न प्रमाणपत्र कोणीच विचारत नाही याची व्यवस्थापकीय संचालकांनी नोंद घ्यावी आदी मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. सदरील मागण्यांसदर्भात महामंडळाच्या संचालकांनी तात्काळ योग्य तो निर्णय घेतला नाही तर १५ दिवसानंतर बीडमध्ये मोर्चा काढण्याचा इशारा रवि शिंदे व इतरांनी दिला आहे.

# बीड जि.प. उर्दू शाळांना स्वतंत्र डीडीओ कोड द्या

## संच मान्यतेतील अडचणी दूर करण्यासाठी उर्दू शिक्षक संघटनेची मागणी

बीड,(दिव्य न्युज):- बीड जिल्हा परिषदेत उर्दू व मराठी माध्यमाच्या शाळा २०१३ मध्ये स्वतंत्र करण्यात आल्या. मात्र काही शाळांमधील शिक्षकांचे वेतन आजही एकाच ऊऊज कोडवरून काढले जात असल्याने, उर्दू शिक्षकांची नोंद मराठी शाळेच्या ऑनलाइन संच मान्यतेत चुकीच्या पद्धतीने दाखवली जात आहे.

यावर्षी शालार्थ प्रणालीद्वारे संच मान्यता सुरू झाल्याने, उर्दू शाळांना शिक्षक नोंद, वेतन मंजुरी व संच मान्यतेत तांत्रिक अडचणी येत आहेत. परिणामी, संच मान्यता प्रक्रिया अपूर्ण राहण्याचा धोका निर्माण झाला आहे.या समस्येवर उपाय म्हणून अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना, जिल्हा परिषद बीडचे अध्यक्ष श्री. काझी मुशाहेद अजिज, कार्याध्यक्ष खान उस्मान शाईस्ता, तसेच पदाधिकारी शेख इम्रान, फारुकी रईस व कलीम बागे यांनी उर्दू शाळांसाठी स्वतंत्र नवीन ऊऊज कोड मंजूर करावा आणि संच मान्यतेतील सर्व अडथळे



तातडीने दूर करावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.हे निवेदन शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. बीड, आणि गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती बीड यांच्याकडे सादर केले गेले.यावेळी मा. शिक्षणाधिकारी प्रा. श्रीम. मा. डॉ. किरण कुंवर यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळेस उपशिक्षणाधिकारी शेख जमीर सर आणि मा. गटशिक्षणाधिकारी समंदर खान साहेब उपस्थित होते.संघटनेच्या या मागणीला शिक्षक वर्गातून मोठा पाठिंबा मिळत असून, प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेणे गरजेचे असल्याचे शिक्षक संघटनेने नमूद केले आहे.

# अजित पवार गटाने बनवलेल्या विकास आघाडीमध्ये मौलाना आझाद नाव का नाही? इलियास इनामदार

बीड (दिव्य न्युज):- बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व मित्रपक्षाच्या वतीने गटनेते फारुक़ पटेल साहेब यांची निवड झाली अभिनंदन परंतु नगरपालिका गटाला नाव दिले शिव शाहु फुले आंबेडकर शहर विकास आघाडी, खुप छान स्वागत आहे सर्व राष्ट्रपुरुषांच्या नावाने गट बनवला गेला, परंतु या गटामध्ये मौलाना आज़ाद नाव का नाही? का एकतर भारतरत्न मौलाना अबुल कलाम आज़ाद राष्ट्रपुरुष नाही नसता तुम्ही मानत नाही का? मुस्लिम समाजाला मतापुरता वापर करण्याची सवय तुमच्यासह सर्व राजकीय पक्षांना झालेली दिसत आहे अशी खंत व आरोप



लोकसेना संघटना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांच्या वतीने करण्यात आले व आ. विजयसिंह पंडित साहेब, शेख मुजीब फारुक़ पटेल निजाम सरकार अमर नाईकवाडे सह सर्व राकाँपा अजित पवार गटातील नेत्यांना लोकसेना संघटनाची मागणी आहे तात्काळ नगरपालिका बीड शहर विकास आघाडीच्या नावात दुरुस्ती करुन शिव शाहु फुले आंबेडकर आज़ाद शहर विकास आघाडी नाव देवून राष्ट्रपुरुष भारतरत्न मौलाना आज़ाद यांना न्याय देण्यात यावे नसता लोकसेना संघटना आंदोलन करणार अशी माहिती लोकसेना संघटना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांनी दिली आहे.

# जिंतुरात अवैध धंदे व गुन्हेगारी करणाऱ्यावर पोलीसाचे धाडसत्र सुरुच



जिंतुर ,(दिव्य न्युज):- जिंतूर शहरात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग परभणी व स्थानिक पोलीसच्या वतीने शहरात अवैधधंदे करणाऱ्या व गुन्हेगारी स्वरूपाच्या व्यक्तींवर पोलिसांनी चांगलीच वचक निर्माण केली असून गेल्या आठवड्यात त्यांनी शहरातील विविध भागातून गुटखा व तंबाखूजन्य बंदी असलेल्या व अंमली पदार्थावर जप्ती करून धरपकड केली होती तसेच. दिनांक २९ व ३० डिसेंबर २०२५ रोजी शहरातील गणपती गल्ली परिसरात राहणाऱ्या अभिजित उर्फ बिल्ली सुभाष राठोड यांच्या कडून २५ हजार ५०० रु चा गांजा जप्त करण्यात आला तर हिदायत नगर परिसरातून एका युवका च्या घरावर धाड मारून तलवार जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला होता दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी परभणीच्या स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने जिंतूर शहरातील नुराणी कॉलोनी येथून एका युवकाच्या घरी धाड मारून धारदार खंजिर जप्त करण्यात आला अश्या कार्यवाह्या मुळे गुन्हेगारी करणाऱ्या व्यक्तींवर चांगलीच वचक बसली असून नागरिकांमध्ये पोलिसांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे.या सर्व कार्यवाहीत परभणीचे जिल्हा पोलीसअधीक्षक मा.रवींद्रसिंह परदेशी व सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मा.जीवन बेनिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिंतूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे व परभणीचे गुन्हे अन्वेषण पोलीस निरीक्षक विवेक पाटील, सिद्धेश्वर चाटे, व त्याची टिम काम करीत आहेत .



























### करुणा शर्मांचा पत्नी म्हणून उल्लेख टाळल्याचं प्रकरण

# धनंजय मुंडेविरोधातील याचिका फेटाळली



बीड (दिव्य न्युज):- राष्ट्रवादीचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधातील करुणा शर्मांची याचिका परळी न्यायालयाने फेटाळली आहे. धनंजय मुंडे यांच्या शपथपत्रामध्ये खोटी माहिती दिली असल्याचा आरोप करत करुणा शर्मा यांनी तक्रार केली होती. परळी प्रथम वर्ग न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. त्यामुळ धनंजय मुंडे यांच्यासाठी हा मोठा दिलासा असल्याचं सांगण्यात येत आहे.

लोकप्रतिनिधी अधिनियम कायद्याच्या अंतर्गत ऑनलाइन पद्धतीने करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात तक्रार केली होती. परळीच्या प्रथमवर्ग न्यायालयात सुनावणी पार पडली. विधानसभा निवडणुकीत आमदार धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्या नावाचा उल्लेख टाळल्या प्रकरणी शर्मा यांनी ऑनलाइन पद्धतीने तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत निवडणूक रद्द करण्याची मागणी त्यांनी केली होती. या प्रकरणात दोन्ही बाजूचा युक्तिवाद झाल्यानंतर करुणा शर्मा मुंडे यांची तक्रार परळी न्यायालयाने फेटाळली आहे.

याआधी देखील कृषी विभागाच्या खरेदीत धनंजय मुंडे यांनी भ्रष्टाचार केला होता असा आरोप करण्यात आला होता. त्या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये कोणतेही तथ्य आढळले नसल्याचे सांगत मुंबई उच्च न्यायालयाने तक्रारदाराला दंड लावला होता.करुणा शर्मा या माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी आहेत. त्यांनी या आधीही धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केला आहे. धनंजय मुंडे यांनी आपला मानसिक छळ केला असं करुणा शर्मा यांनी म्हटलं होतं. तसेच करुणा शर्मा यांनी वाल्मिक कराडवरही आरोप केला होता.

# मोमीन पुरा बायपास येथील शेख इलियास चांद बेपत्ता

बीड, (दिव्य न्युज):- मोमीन पुरा परिसरातील मोमीन पुरा बायपास येथे वास्तव्यास असलेला तरुण शेख इलियास चांद वय २३ हा दिनांक २४/१२/२०२५ पासून बेपत्ता आहे त्याचा सर्वत्र शोध सुरू असून त्याच्या बद्दल कोणास काही माहिती असल्यास त्याच्या बद्दल कळविण्याची विनंती कुटुंबीयांनी केली आहे



सदरील युवक हा मजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवत होता नेहमी प्रमाणे मजूरी च्या शोधासाठी कारंजा परिसराकडे जात आहे असे सांगून तो दिनांक २४ डिसेंबर रोजी घरातून बाहेर पडला घरातून जात असताना त्याने पांढऱ्या रंगाचा शर्ट व हिरव्या रंगाची पँट घातलेली आहे

नेहमी प्रमाणे तो रात्री घरी परतत असे मात्र त्या दिवशी तो परतलाच नाही त्या नंतर नातेवाईकांनी त्याचा सर्वत्र शोध सुरू केला तरी तो मिळून आला नाही जेणे करून कुटुंबीय चिंतित आहेत शेवटी पेठ बीड पोलिस ठाणे गाठून कुटुंबीयांनी रीतसर फिर्याद दिली आहे तरी कोणास ही शेख इलियास चांद हा दिसल्यास त्यांनी पेठ बीड पोलिस ठाणे किंवा इलियास चा भाऊ एजाज ,मित्र राजू यांच्याशी या ९५११७५७२७०, ९६०४१८९८९२ संपर्क क्रमांकावर संपर्क करावे असे आवाहन करण्यात आले आहे

# परळीत घरात घुसून वस्तऱ्याने जीवघेणा हल्ला

## पती-पत्नीवर गुन्हा दाखल

परळी (दिव्य न्युज):- परळी येथील कंडक्टर कॉलनी परिसरात किरकोळ कारणावरून घरात घुसून एका तरुणावर वस्तऱ्याने जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. ३० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी पावणे सहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

उद्धव विनायकराव हाडबे राहणार हाडबेवाडी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आपल्या घरात झोपलेले असताना आरोपी सुनील राऊत याने बेकायदेशीरपणे घरात प्रवेश केला आणि आपल्या हातातील वस्तऱ्याने उद्धव यांच्या कानावर आणि गालावर वार करून गंभीर दुखापत केली. यावेळी आरोपीची पत्नी रूपाली सुनील राऊत हिने देखील फिर्यादीच्या घरात घुसून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी संभाजीनगर परळी वै पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक शिंदे आणि सहायक फौजदार ननवरे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०